**दि.१३/०७/२०१९**

**प्रेसनोट**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**कर्जाचे पैशे फेडण्यासाठी फेसबुक फ्रेन्ड महिलेचे अंगावरील सोने काढून घेवून केला खुन**

एक महिला या दि. २२/०६/२०१९ रोजीपासून मिसिंग असलेबाबत त्यांचा मुलगा,वय १९ वर्षे, रा.पिंगळ वस्ती पुणे यांनी तक्रार दिल्याने मुंढवा पोलीस ठाणे मिसिंग क्र.६०/२०१९ अन्वये दाखल करण्यात आलेने, सदर मिसिंग महिलेचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक,संपतराव भोसले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक,अमोल गवळी, स्वप्निल पाटील व तपास पथकाचे कर्मचारी हे करीत असताना मिसिंग महिला यांचे फेसबुक फ्रेन्ड आनंद निकम यांचेवर संशय बळावल्याने त्यास चौकशीकामी त्याचे राहते ठिकाणी जावून तपास करता सदर इसम काहीएक माहिती न देता तेथून पळून गेल्याने व त्याचे नातेवाईक व मित्र परिवार यांनादेखील काहीएक न सांगता घर सोडून गेला असे सांगितले. तसेच मिसिंग महिला हिचे मोबाईल आनंद याचे कारमध्ये मिळून आलेने त्याचेविरुध्द संशय बळावल्याने नमूद आरोपीविरुध्द मुंढवा पोलीस ठाणे गु.र.नं.२१६/१९ भा.द.वि.कलम ३६३, ३६४(अ) अन्वये दि.१०/०७/२०१९ रोजी गुन्हा नोंद करुन त्याचा शोध घेवून व बातमीदारामार्फत माहिती मिळवून त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली.

अटक आरोपी नामे आनंद शिवाजी निकम रा, सर्वे.नं.५९/१,वृंदावन कॉलनी तापकीर नगर काळेवाडी,पुणे याचेकडे सदर महिलेबाबत चौकशी करता आरोपीने सदर महिलेशी फेसबुकवरुन ओळख झाल्याने व त्यातून जवळीक वाढली होती व ते एकमेकांना भेटत होते. आरोपीने त्याचेवर कर्ज झालेले असल्याने व पैशाची आवश्यकता असल्याने सदर महिलेस दि.२२/०६/२०१९ रोजी संपर्क करुन ताम्हिणी घाटात फोटोग्राफी करण्यासाठी दागिणे घेवून येणेस सांगितले. त्याप्रमाणे सदर महिला अंगावर दागिणे घालून स्वतःची ॲक्टीव्हा स्कुटरवरुन आरोपीस भेटले व त्यानंरत ते दोघे मिळून ताम्हीणी गाव येथील निर्जन ठिकाणी जावून आरोपीने सदर महिलेचे हातपाय दोरीने बांधून व डोळयावर पट्टी बाधून तिचे गळयावर चायनीज चाकूने वार करुन खून केला, अशी कबुली दिल्याने सदर आरोपीसह सदर ठिकाणी जावून तपास करता सदर महिलेचा डिकम्पोज झालेला मृतदेह मिळून आल्याने व सदरचा मृतदेह हा मिसिंग महिला हिचाच असलेबाबत तिचे यांनी सांगुन तीची ओळख पटविली आहे. अटक आरोपी याने गुन्हा करुन काही पुरावे नष्ट केले असून, सदर आरोपी सध्या पोलीस कस्टडीमध्ये आहे.

सदर गुन्हयाचा मा. डॉ. के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर, मा. सुनिल फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे, सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर, सुनिल देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव भोसले यांचे मार्गदर्शनाखाली अमोल गवळी, पोलीस उप निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे हे तपास करीत आहेत व स्वप्निल पाटील पोलस उप निरीक्षक सहा पोलीस फौजदार सोनवणे, पोहवा २०३९ चव्हाण, पोना१५९० गायकवाड, पो.ना २५३२ जगताप, पोनि १५९० ्गायकवाड, पो.ना ६५४५ चव्हाण पो.ना. ७६९५ जाधव, पोशि ७६७७ काकडे,पोशि. ८१८१ शिंदे, पो.शि.७७०० कांबळे, पो.शि८२२६ देशमुख यांनी उपरोक्त कामगिरी केली आहे.

**दि.१३/०७/२०१९**

**(संपतराव डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**